CMYK


आधुनिक पीक पद्धतीचा अंगीकार करून बळीराजाचे उत्पादन वाढविण्याचे कार्य कौतुकास्पद - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन
>> पान 2
समाजसेवेचा आनंद जगण्याला नवी ऊर्जा देते : सिद्धार्थ खरात
>> पान 3
गुजरात येथून आलेल्या मशाल ज्योतीचे मेहेकरात जल्लोषात स्वागत
>> पान 4
सुविचार

यशाकडे नेणारा सर्वात जवळचा मार्ग अजून तयार व्हायचा आहे.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



मला कोणत्याही चित्रपटाची ऑफर आलेली नाही रणबीर कपूरने 'धूम ४'वर दिली अशी प्रतिक्रिया
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 54 ■ सोमवार, दि. 30 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# शिवणगाव येथील प्रकल्पग्रस्तांना जो शब्द दिला होता त्याची पूर्तता करता आली याचे खरे समाधान - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचे आवंटनपत्र बहाल




दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** देशातील सर्वोत्तम विमानतळ म्हणून जे वैभव मिहानच्या माध्यमातून नागपूरला मिळत आहे, त्या वैभवाचा पाया हा शिवणगाव येथील अनेक कुटुंबांच्या योगदानातून साकारलेला आहे. शिवणगाव मधील प्रकल्पग्रस्त रहिवासीयांना न्याय भेटला पाहिजे, ज्यांच्या जमीनी गेल्या आहेत त्यांना योग्य मोबदला भेटला पाहिजे, यासाठी आम्ही सुरुवातीच्या काळापासून आग्रही होतो. विरोधी पक्ष नेता असतांना यासाठी पुन्हा आपण लढा दिला. तेव्हा रहिवासीयांना फार कमी जागा या दर्शविल्या गेल्या होत्या. रेडीरेकनरचे दर कमी करुन तत्कालीन शासनाने अन्याय केला. मला मुख्यमंत्री म्हणून संधी मिळाल्यानंतर स्थानिकांच्या या अन्यायाला दूर करण्यासाठी आम्ही प्राधान्य दिले. शिवणगाव वासियांना जो शब्द दिला होता त्याची पुर्तता करता आली याचे आज समाधान आहे असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. शिवणगाव येथील समाज भवनात आयोजित भूखंड वितरण समारंभात ते बोलत होते. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीच्यावतीने आयोजित या कार्यक्रमास व्यवस्थापकीय संचालिका स्वाती पाण्डेय, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, स्थानिक पदाधिकारी यांची यावेळी प्रमुख उपस्थितीत होती.

कोणत्याही प्रकल्पासाठी जागा घेतांना रेडीरेकनरचे दर कमी करुन जागा घेणे हे कोणत्याच कायद्यात बसणारे नव्हते. यासाठी आपल्याला न्यायालयीन लढा द्यावा लागला. या लढयात आपल्याला यश मिळाले. त्यामुळेच शिवणगाव मधील अनेकांना त्यांच्या जमीनीचा कोट्यावधी रुपयांच्या घरात मोबदला मिळाला. अनेकांना आजच्या घडीला कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमत असेलेले प्लाट मिळाले, याचा मला मनस्वी आनंद असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ इटनकर यांनी यासाठी महसूल विभागाशी संबंधित कामे लवकर पूर्ण केल्याचे गौरोद्गार त्यांनी काढले.

न्यायाच्या प्रतीक्षेत शिवणगावातील लोकांनी अत्यंत संयमी व जबाबदार नागरिकत्वाचा प्रत्यय दिला आहे. केवळ विदर्भच नव्हे तर भारताच्या गौरवात भर पाडणारे, विदर्भातील व्यवसायाला, उद्योग जगताला, कृषी क्षेत्राला गती देणाऱ्या विमानतळाबाबत सर्वोच्च न्यायालयाने नुकताच निकाल दिल्याने आता मार्ग मोकळा झाला आहे. आता या प्रकल्पातुन अनेक क्षेत्रात नवनवीन रोजगाराच्या संधी वाढणार असून स्थानिकांना चांगली संधी मिळेल अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश भोयर यांनी केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवणगाव येथील बबनराव महाले, सागर, संजय, अजय, सुरेश, गजानन महाले, प्रविण वरणकर, संदीप वरणकर , शेषराव शहाणे, दशरथ शहाणे, रामचंद्र शहाणे, राजेंद्र नितनवरे, कविता भोंगाडे, पाडुरंग देशमुख, सरस्वताबाई ठाकरे, निर्मलाबाई ठाकरे, अशोक ठाकरे, सुनिल ठाकरे, रंगराव ठाकरे, शकुंतला, अतुल, अमोल ठाकरे, सुनिल झलके, सविता झलके, अशोक नेवारे, देवराव डेंगे, रमेश डेंगे, सुधाभाई डेंगे आदींना प्रातिनिधीक स्वरुपात भूखंडाचे आवंटनपत्र बहाल करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र घरेलू कामगार मंडळातर्फे कामगारांना कीट वाटप करण्यात आले. महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पिएम मोदींच्या हस्ते झालेल्या विमानतळाच्या उद्धाटनाला महायुतीच्या आमदारांची दांडी

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** आज सोलापूर विमानतळाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने उद्धाटन करण्यात आले. मात्र, या कार्यक्रमाला जिल्ह्यातील बहुतांश आमदार आणि खासदारांनी दांडी मारल्याचं दिसून आले. जिल्ह्यात एकूण ११ विधानसभा आमदार, १ विधानपरिषद सदस्य, दोन खासदार आहेत. प्रणिती शिंदे, धैर्यशील मोहिते पाटील या दोन महाविकास आघाडीच्या खासदारांसह महायुतीच्या बहुतांश आमदारांनी उद्धाटनाच्या कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. सोलापूर विमानतळाचे उदघाट्न कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने असले तरी प्रशासनाने सोलापूर विमानतळावर या कार्यक्रमाचे थेट प्रेक्षपण आयोजित केले होते.




## माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीला

### पर्यायी मतदारसंघासाठी राजकीय खलबते?



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख यांनी आज शिवसेना उबाठा गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे. उद्धव ठाकरे हे आज नागपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. नागपूर जिल्ह्यातील कळम `श्वर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूप पुतळ्यांचे ते आज अनावरण करणार आहेत. त्यानंतर ते नागपूर जिल्ह्यासह विदर्भातील प्रमुख पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेणार आहे. दरम्यान, आज उद्धव ठाकरे यांचा मुक्काम नागपुरातील हॉटेल रेडिसन येथे आहे. यावेळी त्यांची भेट घेण्यासाठी सलील देशमुख पोहचले आहे.

अनिल देशमुख हे काटोल विधानसभा सोडायला तयार नसल्याने सलील देखमुख हे पर्यायी मतदार संघाच्या शोधात आहे . त्यामुळे सलील देशमुख यांच्या पर्यायी मतदारसंघाला घेऊन नागपूर जिल्ह्यात जोरदार चर्चा रंगली आहे. परिणामी, त्या पार्श्वभूमीवर सलील देशमुख यांची उद्धव ठाकरे यांच्याशी झालेली भेट महत्वाची मनाली जात आहे.

पूर्व विदर्भातील २८ विधानसभा मतदारसंघाचा शिवसेना ठाकरे गटाकडून आढावा

उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि आमदार भास्कर जाधव यांनी नुकताच विदर्भाचा दौरा केला होता. यावेळी त्यांनी पूर्व विदर्भातील पदाधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. दरम्यान, पूर्व विदर्भातील २८ विधानसभा मतदारसंघाचा शिवसेना ठाकरे गटाकडून आढावा घेतला आणि त्यातील ८ ते १० जागांची आमची मागणी असल्याचे वक्तव्य आमदार भास्कर जाधव यांनी केलं होतं. यात नागपूर जिल्हात ५ जागेवर उबाठाचा दावा केला असून रामटेक, कामठी, उमरेड आणि शहरातील नागपूर दक्षिण आणि नागपूर पूर्वची मागणी आम्ही करणार असल्याचेही ते म्हणाले होते. त्यामुळे या जागांवर अंतिम निर्णय आज उद्धव ठाकरे घेणार असल्याची शक्यता आहे.

रामटेक विधासभेच्या जागेवरुन दोन गाटात नारेबाजी

दुसरीकडे नागपूर जिल्ह्यातील रामटेक विधासभेच्या जागेवरुन करण्यात आलेल्या दाव्याला घेऊन उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या दोन गटाची समोरासमोर नारेबाजी झाल्याचे बघायला मिळाले आहे. विशाल बरबटे आणि माजी खासदार प्रकाश जाधव या दोन्ही नेत्यांनी रामटेक विधासभेच्या जागेची पक्षाकडे मागणी केली आहे. मात्र यावर अंतिम निर्णय व्हायचा असला तरी कार्यकर्ते आपल्या नेत्याला तिकीट मिळावी यासाठी आक्रमक झाल्याचे दिसत आहे. आज भास्कर जाधव यांनी नागपुरातील रवी भवन येथे आढावा बैठक ठेवली होती. तेव्हा हे दोन्ही गट समोरासमोर आल्यानंतर आपापल्या नेत्याच्या विजयाचा जयघोष कार्यकत्यांनी केला. त्यामुळे काही क्षणासाठी वातावरण गंभीर झाले होते.

## उपमुख्यमंत्री फडणवीसांनी बैठक घेताच ओबीसी समाजातील ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती मंजूर

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना २०१९ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ३० ऑक्टोबर २०२३च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांची संख्या ७५ इतकी करण्यात आली. २०२४-२५ या वर्षाकरिता परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सुरुवातीला अर्ज मागविण्यात आले. या अर्जांची इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने छाननी करून, अर्जातील त्रुटींची पूर्तता करून अभ्यासक्रमनिहाय गुणवत्ता यादी तयार केली गेली. ही यादी १० सप्टेंबरला राज्य सरकारला सादर केली. यानंतर इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने २३ सप्टेंबरला झालेल्या बैठकीत पात्र ७५ विद्यार्थ्यांची निवड केली. या शिष्यवृत्तीचा लाभ मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाचा फायदा देशसेवेसाठी करून देणे आवश्यक राहणार आहे. तशा आशयाचे हमीपत्र लिहून द्यावे लागणार आहे.

### ओबीसी संघटनांनी मानले फडणवीसांचे आभार

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील पात्र ७५ विद्यार्थ्यांना २०२४-२५ या वर्षासाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी शिवष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. विशेष, म्हणजे अर्ज प्रक्रिया होऊनही पात्र विद्यार्थ्यांची यादी रखडली होती. यानंतर ओबीसी संघटनांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हा विषय निदर्शनास आणून दिला. यानंतर तातडीने फडणवीस यांनी बैठक घेऊन पात्र विद्यार्थ्यांची निवड जाहीर करण्याचे आदेश दिले. तसेच, अवघ्या तीन दिवसांत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. ओबीसी संघटनांनी यावर समाधान व्यक्त करत फडणवीसांचे आभार मानले.

## वैमानिकाने विमान उडवण्यास दिला नकार; उदय सामंतांना कारने गाठावे लागले

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** उद्योगमंत्री उदय सामंत हे नागपूरवरून शुक्रवारी ३ वाजून ४५ मिनिटांनी एमआयडीसीच्या 'उद्यमात सकल समृद्धी महाराष्ट्राची उद्योग भरारी' या सोहळ्याला पोहोचले. कार्यक्रमाला आलेत. नागपूर येथील कार्यक्रम आटपून कारने अमरावती शहरातील मैफिलीन हॉटेल या कार्यक्रम स्थळी तब्बल १ तास ४५ मिनिटे उशिराने पोहोचले. उद्योग मंत्री उशिरा आल्यामुळे हा कार्यक्रम देखील लांबला. हा कार्यक्रम साडेचार वाजता आटोपता घेत उद्योग मंत्री थेट विमानतळाकडे रवाना झालेत.

विनंती करूनही वैमानिकाचा नकार- उद्योग मंत्री उदय सामंत यांना बेलोरा विमानतळावरून संभाजीनगर विमानतळावर नेण्याकरिता मुंबई येथील खासगी कंपनीचे विमान उतरलं होतं. हे विमान चार वाजता उड्डाण घेणार असताना उद्योग मंत्री मात्र तासभर उशिरानं विमानतळावर पोहोचले. त्यामुळे वैमानिकानं विमान उडवण्यास नकार दिला. उद्योग मंत्री उदय सामंत यांनी वैमानिकाला विनंती केली. मात्र तो त्याच्या निर्णयावर ठाम होता. विमान कंपनीच्या मालकांनीदेखील वैमानिकाचीच बाजू घेतली. अखेर उद्योग मंत्री उदय सामंत यांना संभाजीनगरला जाण्याकरिता कारशिवाय पर्याय नव्हता. दिलेल्या वेळेचं पालन केलं नसल्यानं उद्योग मंर्त्याच्या झालेल्या गोचीची आता चर्चा रंगायला लागली आहे.

उशीर झाल्यानं उडाली तारांबळ निवासी जिल्हाधिकारी अनिल भटकर म्हणाले, ''मंत्री महोदय तासभर उशिरानं विमानतळावर पोहोचल्यामुळे विमान कंपनीनं त्यांना संभाजीनगरला नेण्यास नकार दिला. विमान कंपनीच्या मालकाशीदेखील उद्योग मंत्री बोललेत. मात्र तासभर वेळ झाल्यामुळे कंपनी आपल्या निर्णयावर ठाम राहिली,'' असे देखील अनिल भटकर यांनी स्पष्ट केलं.



तेरा वर्षाहून अधिक काळ विमानतळाचं चाललं काम-महाराष्ट्रातील सातवे मोठे शहर असणारे अमरावती हे विभागीय शहर आहे. अमरावती येथील बेलोरा विमानतळाचं पंधरा वर्षापासून केवळ कामच सुरू राहिले होते. नांदेड ,लातूर, कोल्हापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, शिर्डी, गोंदिया आदी ठिकाणी तालुका पातळीवर विमानतळ निर्माण झाले असताना अमरावतीमध्ये कामाला गती नसल्यानं लोकप्रतिनिधींवर टीका झाली होती. अमरावती विमानतळाच्या विस्तारित कामाचं भूमिपूजन तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १९ जुलै २०१९ रोजी करण्यात आलं होतं. भूमिपूजन समारंभात अमरावती विमानतळ ऑगस्ट २०२० मध्ये सुरू होईल, असं स्पष्ट करण्यात आलं होतं. मात्र, प्रत्यक्षात विमानतळाच्या कामाला दिरंगाई झाली.

CMYK

## गदिमां बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०५ वि जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्र्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# आधुनिक पीक पद्धतीचा अंगीकार करून बळीराजाचे उत्पादन वाढविण्याचे कार्य कौतुकास्पद - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## सन २०२०, २०२१ व २०२२ वर्षातील राज्यस्तरीय कृषी सन्मान पुरस्कार वितरण सोहळा




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र हे देशात प्रत्येक क्षेत्रात पुढाकार घेवून आपला ठसा उमटविणारे राज्य आहे. कृषी क्षेत्रातही राज्याची भरारी वाखणण्याजोगी आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जात असताना सगळीकडे शेतकरी आधुनिक पीक पद्धतीचा अवलंब करीत असल्याचे प्रकर्षाने दिसले. उत्पादन वाढीसाठी बळीराजा करीत असलेले कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण यांनी काढले. यावेळी त्यांनी पुरस्कार विजेत्या शेतकरी बांधवांचे अभिनंदन केले.

कृषी विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षाचे सत्कार व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन वरळी येथील एन. एस. सी. आय डोम येथे करण्यात आले. त्यावेळी राज्यपाल श्री. राधाकृष्णन उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमास व्यासपीठावर उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार विक्रम काळे, कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे, फलोत्पादन विभागाचे संचालक कैलास मोते उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्ण म्हणाले, राज्याची एक रुपयात पीक विमा योजना ही देशात एकमेव आहे. या योजनेचा अन्य राज्य अंगीकार करत आहे. राज्यात कृषी क्षेत्रात अनुदान योग्य मार्गाने दिले जात आहे. शेततळ्याकरीता अनुदान देण्यात येत असल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर शेततळे घेवून शेतीला संरक्षित सिंचन उपलब्ध करत आहे. ठिबक सिंचन अनुदान ही राज्याची एक मोठी योजना आहे, यामुळे प्रत्येक थेंबाचा उपयोग उत्पादन वाढीसाठी होत आहे.

महाराष्ट्र राज्य कापूस, सोयाबीन, केळी व द्राक्ष उत्पादनात देशात अव्वल आहे. राज्यातील बळीराजाची मेहनत व आधुनिक तंत्रज्ञानाचा होत असलेला अंगीकार यामुळे महाराष्ट्र हे देशात कृषी क्षेत्रातील अग्रगण्य राज्य बनले आहे, असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी यावेळी सांगितले. पुरस्कार वितरणावेळी शेतकरी माझ्यासोबत छायाचित्र काढत नाही, तर मीच शेतकऱ्यांसोबत छायाचित्र काढणार आहे, असे बोलून राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी बळीराजाच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाला राज्यभरातून आलेले शेतकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार संचालक (कृषी व विस्तार) विनयकुमार आवटे यांनी मानले.

आपल्या काळ्या आईची सेवा करून मोठ्या कष्ट, मेहनतीने अन्नधान्याचे उत्पादन बळीराजा घेत असतो. कुठल्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये शासन बळीराजाच्या पाठीशी आहे. २०२३ मध्ये सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना झालेल्या दरामध्ये झालेल्या नुकसानीपोटी प्रती हेक्टरी पाच हजार दोन हेक्टर मर्यादेत देण्यात येणार आहे. राज्यातील आधार संलग्न बँक खात्यांची पडताळणी झालेल्या ६५ लाख शेतकऱ्यांना अनुदान मंजूर झाले आहे. या अर्थसहाय्याचे वितरण डीबीटी प्रणालीद्वारे थेट बँक खात्यात उद्यापासून करण्यात येणार आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केली. तसेच ऊर्वरित शेतकऱ्यांच्या खात्याचे आधार संलग्नता व कागदपत्रांची पडताळणी करून अर्थसाहाय्याचे वितरण करण्यात येईल,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री पवार म्हणाले, शेतकऱ्यांच्या साडेसात अश्वशक्तीपर्यंत कृषी वीजपंपाचे देयक माफ करण्यात आले आहे. यापुढे साडेसात एचपीपर्यंत वीज पंप असणाऱ्या शेतकऱ्यांना देयक येणार नाही. दिवसा वीज देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. त्यानुसार ९ हजार ५०० मेगावॅट वीज सौर उर्जेवर निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. पुढील सहा महिन्यात शेतकऱ्यांना दिवसा पूर्णपणे वीज मिळणार आहे. शेतकऱ्यांना २४ हजार कोटी रुपये खर्चून साडेआठ लाख सौर कृषी पंपाचे वितरण हे करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी जिथे केंद्र शासनाची मदतीची आवश्यकता असते, तिथे केंद्रशासन राज्याला मदत करीत आहे. कांदा व बिगर बासमती तांदुळावरील निर्यात बंदी उठविण्यात आली आहे. सोयाबीन खाद्यतेलावर आयात शुल्क वाढविल्यामुळे सोयाबीनच्या किमती वाढणार आहे. याचा लाभ सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे. ऊसाला किमान आधारभूत किंमत वाढवीण्यासाठी केंद्र शासनाची चर्चा झाली आहे. शासन गायीच्या दुधाला सात रुपये प्रति लिटर अनुदान, अटल बांबू समृद्धी योजना, नळगंगा – वैरागंगा नदी जोड प्रकल्प, पश्र्चिमेकडून समुद्रात वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळविणे अशा महत्त्वाच्या योजनांवर शासन काम करीत आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले. बळीराजाला त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी देण्यात येणाऱ्या पुरस्काराची रक्कम चौपट करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

हजारो वर्षांपूर्वी शेतीची जेव्हा सुरुवात झाली, तेव्हापासून शेतकरी या व्यवसायात आहे. शेती क्षेत्रात संशोधन करून शेतकऱ्यांनी समाजात सुबत्ता आणली आहे, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज सत्कार व पुरस्कार वितरण समारंभात केले.

कृषिमंत्री श्री. मुंडे म्हणाले, कृषी विभागाने मिशन मोडवर पुरस्कारांची छाननी पूर्ण करून मागील तीन वर्षांचे पुरस्कार देण्यात येत आहे. बळीराजाला मुंबईत सन्मानपूर्वक आमंत्रित करून त्याच्या कार्याचा यथोचित गौरवाने काळ्या आईची सेवा करणाऱ्या बळीराजाचे ऋण फेडण्याची ही संधी आहे.

परंपरागत शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात येत आहे. शेतीमध्ये ड्रोनचा वापर करण्यात येत आहे. शेतीमालाच्या दरासाठी ॲग्रोथॉन प विकसित करण्यात आले आहे. सोयाबीन संशोधनासाठी शासन प्रयत्न करीत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, सोयाबीन उत्पादन वाढ व मूल्य साखळीचा विकास, एक रुपयात पिक विमा, कृषी यांत्रिकीकरण, गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात अनुग्रह अनुदान योजना, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प आदींची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

परळी (जि. बीड) येथे सोयाबीन संशोधन संस्था, नागपूर येथे आंतरराष्ट्रीय कृषी संशोधन केंद्र, चांदूरबाजार (जि. अमरावती) येथे सिट्रेस इस्टेट, दिवे आगार येथे सुपारी संशोधन केंद्र, बुलढाण्यात शासकीय कृषी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०२३ – २४ मध्ये राज्यात १४२. ६४ लाख मेट्रिक टन अन्नधान्य उत्पादन घेण्यात आले आहे. यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ३. ३९ टक्क्याने वाढ नोंदविण्यात आली आहे. हे सर्व माझ्या बळीराजाचे यश आहे, अशा शब्दात कृषी मंत्री श्री मुंडे यांनी बळीराजाचे कौतुक केले.

राज्याच्या कृषी क्षेत्राच्या भरीव कामगिरीची दखल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील घेण्यात आली आहे. वर्ल्ड अग्रिकल्चर फोरमने राज्यला दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देऊन सन्मानित केले आहे, असेही कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी सांगितले.

सन २०२०, २०२१ व २०२२ करिता विविध कृषी पुरस्कारांचे वितरण राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याहस्ते आज विविध ४४८ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यामध्ये ५ शेतकरी बांधवांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, २७ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, २६ शेतकऱ्यांना जिजामाता कृषी भूषण पुरस्कार, २५ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार, २१ शेतकऱ्यांना कृषी भूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, २५ शेतकऱ्यांना युवा शेतकरी पुरस्कार, २५ शेतकऱ्यांना उद्यान पंडित पुरस्कार, ९६ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (सर्वसाधारण गट), १७ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (आदिवासी गट) शेतकऱ्यांना देण्यात आले. तर २७ अधिकारी व कर्मचारी यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार देण्यात आले. तसेच राज्यस्तरीय पीक स्पर्धेतील विजेत्या १५४ शेतकऱ्यांना यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आले. अशा प्रकारे ४४८ शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यात आले.

## मला कोणत्याही चित्रपटाची ऑफर आलेली नाही रणबीर कपूरने ‘धूम ४’वर दिली अशी प्रतिक्रिया

**मुंबई/प्रतिनिधी** : ‘धूम’ फ्रँचायझीच्या शेवटच्या तीन भागात जॉन अब्राहम, ऋतिक रोशन आणि आमिर खान यांनी साकारलेली भूमिका चौथ्या भागात रणबीर कपूर साकारणार आहे. म्हणजेच धठऋ च्या सर्वात मोठ्या फ्रँचायझीमध्ये तो नकारात्मक भूमिकेत दिसणार आहे. रणबीर या चित्रपटाचा भाग होणार असल्याची बातमी येताच त्याचे जुने वक्तव्य व्हायरल होऊ लागले, ज्यात त्याने या चित्रपटावर प्रतिक्रिया दिली होती.

२०२३ मध्ये रणबीर धूममध्ये दिसणार असल्याच्याही चर्चा होत्या. त्यावेळी न्यूज १८ ला दिलेल्या मुलाखतीत त्याला याबद्दल विचारण्यात आले, तेव्हा त्याने सांगितले की, मला या चित्रपटात सहभागी व्हायला आवडेल. ‘धूम ४’ च्या प्रश्र्नावर तो म्हणाला होता, खरचं मी आदित्य चोप्रा असतो, तर तुमच्या या प्रश्र्नाचे उत्तर दिले असते. मला ‘धूम ४’ किंवा त्या स्वरूपाच्या कोणत्याही चित्रपटाचा भाग व्हायला आवडेल.

त्यावेळी त्याने असेही म्हटले होते की, मला अद्याप कोणत्याही चित्रपटाची ऑफर आलेली नाही. मात्र, रणबीरने हे सांगून एक वर्ष उलटले आहे. ताजे अपडेट म्हणजे तो या चित्रपटात दिसणार आहे. पिंकविलामधील एका रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की आदित्य चोप्राने ही फ्रेंचायझी पुढे नेण्याची योजना आखली आहे आणि चित्रपटाच्या प्री-प्रॉडक्शनचे काम देखील सुरू झाले आहे.

या चित्रपटात रणबीरसोबत आणखी दोन नवीन कलाकारांचाही प्रवेश होणार असल्याचे बोलले जात आहे. या चित्रपटाची कथा पूर्णपणे फ्रेश असणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे अभिषेक बच्चन आणि उदय चोप्रा यांच्या पात्रांमध्येही दोन नवे कलाकार दिसणार आहेत.

या वृत्तात असेही सांगण्यात आले की, चित्रपटाची मुख्य कथा निश्र्चित झाली आहे. २०२५ च्या उत्तरार्धात किंवा २०२६ च्या सुरुवातीला शूटिंगचे काम सुरू होऊ शकते, असे मानले जात आहे. सध्या हा चित्रपट कास्टिंगच्या टप्प्यात आहे.

# आमदार महेश लांडगे यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेवर स्वाक्षरी केल्याने तीव्र संताप






दैनिक आपला विदर्भ

**पिंपरी/प्रतिनिधी** : विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान कदापि सहन केला जाणार नाही, असं म्हणत विविध सामाजिक संघटनांनी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासमोर आमदार महेश लांडगे यांच्या निषेधार्थ आंदोलन करुन त्यांच्या प्रतिमेला जोडे मारत निषेध व्यक्त केला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर करण्यात येणाऱ्या जाहिरातबाजीत भोसरी मतदासंघाचे भाजप आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या एका जाहिरातीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्रावर आमदार महेश लांडगे यांची सही वापरण्यात आली आहे. ही जाहिरात शहरातील विविध भागात तसेच शेकडो रिक्षांवर करण्यात आली आहे. यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील विवीध सामाजिक संघटनांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या निषेधार्थ पिंपरी चिंचवड शहरातील विविध सामाजिक तसेच पुरोगामी संघटनांच्या वतीने आज रोजी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी शहरातील विविध भागातून मोठ्या प्रमाणात जनसमुदाय आंदोलनासाठी उपस्थित होता.आंदोलनात आमदार महेश लांडगे यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करुन लांडगे यांच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात जन आंदोलन चळवळीचे प्रणेते मानव कांबळे, माजी नगरसेवक मारुती भापकर, धम्मराज साळवे, नरेंद्र बनसोडे,शिवशंकर उबाळे, माऊली बोराडे,शांताराम खुडे, हौसराव शिंदे,जितेंद्र छाबरा, गौतम आरकडे व प्रमोद क्षिरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंदे, दिपक खैरनार, राजन नायर, सिद्धार्थ शिरसाट, राम भंडारे, सुधाकर इंगळे,सचिन काळभोर, यांसह मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सकल मातंग समाजाच्यावतीने महामेळाव्याचे आयोजन




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे आज सकल मातंग समाजाच्या वतीने महामंडळाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मोठ्या प्रमाणावर मातंग समाजाचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. मातंग समाजाच्या वतीने महायुतीला पाठिंबा देण्यात आला असून आगामी निवडणुकांमध्ये देखील मातंग समाज महायुती सोबत आहे त्यामुळे आमच्या प्रलंबित मागण्या लवकर पूर्ण करा असं आव्हान मातंग समाजाच्या नेत्यांनी केले आहे. या कार्यक्रमाला मातंग समाजाचे नेते तथा विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे आणि सकल मातंग समाजाचे अध्यक्ष उपस्थित होते. ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात जामनेर येथे अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा उभारण्यात येणार असल्याच आश्वासन मातंग समाजाला दिले आहे.


### मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी केला मेट्रोचा प्रवास



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : पंतप्रधान मोदींच्या हस्ते सिव्हिल कोर्ट ते ते स्वारगेट हा पुण्यातील पहिला भूमिगत मेट्रे मार्गाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून लोकार्पण करण्यात आलं. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी मेट्रोनी सोबत प्रवास केला.

### नवरात्रीसाठी स्वस्त ज्वेलरी मुंबईमधील भुलेश्वर मार्केटमध्ये दाखल



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवरात्रीचा उत्सव ३ ऑक्टोबरपासून १२ ऑक्टोबरपर्यंत साजरा केला जाईल. या उत्सवात देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाणार आहे. नवरात्रोत्सवादरम्यान अनेक प्रकारचे कार्यक्रमही आयोजित केले जातात. या उत्सवादरम्यान गरबा आणि दांडियाचे आयोजन केले जाते जेव्हा जेव्हा स्त्रिया आणि मुली अशा कार्यक्रमांना जातात तेव्हा त्यांना सर्वात मोठी समस्या भासवत असते ती म्हणजे नवरात्रीच्या काळात त्या सर्वात सुंदर आणि वेगळ्या दिसण्यासाठी स्वतःला कसे तयार करावे. जर तुम्हीही या नवरात्रीला घालण्यासाठी काही चांगल्या ज्वेलरी डिझाईन्स शोधत असाल तर सगळ्यात वेगळे डिझाईनच्या आणि स्वस्तात ज्वेलरी मुंबईमधील भुलेश्वर मार्केटमध्ये विक्रीसाठी आली आहे.




# समाजसेवेचा आनंद जगण्याला नवी ऊर्जा देते : सिद्धार्थ खरात

## सरपंच सुधाकर गारोळे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : वाढदिवसाच्या निमित्त पार्टी सेलिब्रेशन केल्यास एका दिवसाचा आनंद मिळतो, मात्र याच वाढदिवसाला गोरगरिबांचे विविध मार्गाने सेवा करण्याची मिळालेली संधी आणि यातून मिळणारा आनंद हा जगण्याला नवी ऊर्जा देऊन जातो. असे प्रतिपादन मेहकर मतदार संघाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले. ते मेहकर तालुक्यातील वरोडी येथील सरपंच सुधाकर गारोळे यांच्या अभिष्टचिंत सोहळ्यानिमित्त आयोजित नेत्रचिकित्सा शिबिरात मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाला शिवसेना उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, सिंदखेड राजा मतदारसंघातील शिवसेना नेते दिलीप वाघ, किसान सेना नेते बळी, शिवसेना तालुकाप्रमुख लिंगा पांडव, शिवसेना शहर प्रमुख किशोर गारोळे युवा सेनेचे अड्. आकाश घोडे यांच्यासह शिवसेना कार्यकर्ते व पत्रकार बांधवांची, गावातील पुरुष महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सरपंच सुधाकर गारोळे यांना जन्मदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. तर यावेळी मनोगत व्यक्त करताना मेहकर मतदार संघाची इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी वरोडी गावचे सरपंच सुधाकर गारोळे यांच्या वाढदिवसानिमित्त जन्मदिनानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थिती लावून शुभेच्छा देण्याचा योग आला. खरंतर हे गाव तेजस्वी बाबांच्या वास्तव्याने पुनीत झालेले हे गाव आहे. जिल्हाभरामध्ये बाबांचा खूप मोठा भक्त परिवार आहे. वारकरी सांप्रदायाची परंपरा बाबांनी या भागात जनसामान्यांमध्ये रुजवण्यासाठी आपले जीवन समर्पित केले आहे आणि अध्यात्माच्या माध्यमातून जनतेचे दुःख हरण करण्याचे काम केले आहे. त्यांचा आशीर्वाद घेऊन सुधाकर गारोळे राजकारण आणि समाजकारणात अतिशय रचनात्मक कार्य करत आहेत. सरपंच सुधाकर गारोळे यांच्या हातून अशीच समाजसेवा घडो यामध्ये अधिकाधिक भर पडो, त्यांना आरोग्यदायी दीर्घ आयुष्य लाभो, अशी प्रार्थना ईश्र्वर चरणी करून सरपंच सुधाकर गारोळे यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.तसेच यावेळी इतर मान्यवरांनी सुद्धा मनोगत व्यक्त करून सरपंच यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

### विविध मान्यवरांची अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थिती

वरोडी येथील सरपंच सुधाकर गारोळे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला सर्वसामान्यासह सिद्धार्थ खरात यांच्यासह विविध मान्यवरांनी उपस्थिती लावून त्यांना शुभेच्छा दिल्या. तर त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले यावेळी नेत्र चिकित्सा शिबिरात तपासणी झालेल्या रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

## पाटण येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन व मल्हारपेठ येथील ग्रामसचिवलयाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते

दैनिक आपला विदर्भ



**सातारा/प्रतिनिधी** : पाटण येथील केंद्र पुरस्कृत अमृत २.० नळ पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन व मल्हारपेठ येथील लोकनेते बाळासाहेब देसाई ग्रामसचिवालयाचे नूतनीकर इमारतीचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, आयुष व आरोग्य कुटुंब कल्याण केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, नगरपंचायतीचे प्रशासक संतोष मोरे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. या पाणीपुरवठा योजनेची मूळ किंमत १६ कोटी २५ लाख ५६ हजार इतकी आहे. या कामाला २३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या पाणीपुरवठा योजनेमुळे १३५ लिटर दरडोई पाणी देण्यात येणार आहे. निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून या योजनेअंतर्गत ११० मिमी ते २५० मिमी व्यासाची ३८. ९६४ किमी. पाईपलाईन असणार आहे. तर ४,४४२ घरगुती नळ जोडण्या आहेत. या पाणीपुरवठा योजनेचे पाटण शहरवासीयांना मुबलक व शुद्ध पाणी मिळणार आहे. याचे भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले.

मल्हारपेठ येथील ग्रामपंचायत मालकीची तीन मजली इमारत २००१ मध्ये बांधण्यात आली होती. या जुन्या इमारतीवर जन सुविधा योजनेतून ५० लाख खर्चून ग्रामसचिवलयाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. या सुसज्ज ग्रामसचिवालयामुळे मल्हारपेठ ग्रामस्थांना विविध सुविधा मिळणार आहेत. याचेही लोकार्पण मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले.

### ‘थकलोय जरा आराम करतो..’, इंदापुरात पत्नीच्या मृत्यूनंतर तिसऱ्याच दिवशी पतीची आत्महत्या, ७ महिन्याची चिमुकली पोरकी

**इंदापूर/प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यातील इंदापूरमधून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. पत्नीचा विरह सहन न झाल्याने तिच्या मृत्यूच्या तिसऱ्याच दिवशी पतीने आपली जीवनयात्रा संपवली आहे. पत्नीच्या मृत्यूनंतर नैराश्यात गेलेल्या पतीनेही आत्महत्या करत आयुष्याचा शेवट केला आहे. दोनच दिवसांपूर्वी पत्नीचा डेंग्यूने मृत्यू झाला होता. तिच्या मृत्यूच्या तिसऱ्याच दिवशी पतीने आत्महत्या केल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

दोन दिवसात पती-पत्नीचा मृत्यू झाल्याने त्यांची ७ महिन्यांची चिमुकली पोरकी झाली आहे. स्वप्निल सुतार असे आत्महत्या केलेल्या पतीचे नाव आहे. त्याची पत्नी श्रावणी हिचा दोन दिवसापूर्वी डेंग्यूने मृत्यू झाला होता. पत्नीच्या अचानक मृत्यूने स्वप्निल नैराश्येत होता. या नैराश्येतूनच त्याने टोकाचं पाऊल उचललं आहे. मिळालेल्या माहितीनुसार स्वप्निलची पत्नी श्रावणीचा दोन दिवसाआधी डेंग्यूमुळे शुक्रवारी निधन झाले. तिच्या निधनानंतर स्वप्नील कुणाशीही बोलत नव्हता. त्याने जेवणही घेतले नव्हते. आज दुपारी त्याने कुटूंबीयांना सांगितले की, मी थकलोय जरा आराम करतो. असे म्हणत घरातील खोलीत गेला. तो झोपला असेल म्हणून कोणीही त्याला उठवायला गेले नाही. बराच वेळ झाल्याने घरातील नातेवाईकांनी त्याला हाका मारल्या. मात्र आतून काहीच प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी खिडकीतून डोकावून पाहिले. तील दृष्य पाहून त्यांना धक्का बसला. स्वप्नीलने घराच्या छताच्या लोखंडी अँगलला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्याला तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## गणपतीपुळ्याच्या समुद्रात जेएसडब्ल्यू कंपनीचे तीन कर्मचारी बुडाले, दोघांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी** :रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे येथील समुद्रात तीन जण बुडाले होते, यातील दोन जणांचा मृत्यू झाला असून एकाला वाचवण्यात यश आले आहे. मृतांमध्ये जेएसडब्ल्यू कंपनीच्या पोर्टवरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आज सुट्टी असलेल्याने कंपनीचे तीन कर्मचारी समुद्रात पोहण्यासाठी गेले होते. त्यातील दोघांचा बुडून मृत्यू झाला तर एकाला वाचविण्यात यश आले. ही घटना रविवारी सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास घडली.

प्रदीप कुमार (३०, मूळ रा. ओडिशा) आणि महंमद युसूफ (२९, मूळ रा. उत्तराखंड) अशी बुडून मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. तर डाकुआ टुकुना (३०, रा. पश्चिम बंगाल) याला वाचविण्यात यश आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार रविवारी कंपनीला सुट्टी असल्याने जयगड येथील जेएसडब्ल्यू पोर्ट मरीन कंपनीचे कर्मचारी दुपारी फिरण्यासाठी गणपतीपुळे येथे आले होते. सायंकाळच्या सुमारास प्रदीप कुमार, महंमद युसूफ आणि डाकुआ टुकुना हे तिघे समुद्रात अंघोळीसाठी उतरले होते.

तिघांनीही समुद्राच्या खोलीचा अंदाज न आल्याने तिघे बुडू लागले. गणपतीपुळेचा समुद्र पोहण्यासाठी धोकादायक समजला जातो. चाळ पडलेल्या खड्ड्यांचा अंदाज न घेता तिघेजण खोल पाण्यात गेले. आपण समुद्रात बुडत असल्याचे लक्षात येताच तिघांनी आरडाओरडा केला. त्यांचा आवाज ऐकून जीवरक्षक व पोलीस त्यांच्या मदतीसाठी धावले.

तिघांना समुद्रातून बाहेर काढून त्यांना गणपतीपुळे देवस्थानच्या रुग्णवाहिकेने उपचारासाठी तत्काळ मालगुंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक तपासणी करून प्रदीप कुमार व महंमद युसूफ यांना मृत घोषित केले. डाकुआ टुकुना यांच्यावर उपचार करण्यात आले. त्याची प्रकृती स्थिर आहे.

## धक्कादायक ! काश्मीरमध्ये नसराल्लाहच्या समर्थनार्थ मोर्चा



नवी दिल्ली : हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेचा प्रमुख हसन नसराल्लाह याचा शनिवारी इस्रायल कडून खातमा करण्यात आला. आज जम्मू काश्मीर मधल्या बुडगम या भागात, या विरोधात ठिकठिकाणी आंदोलन छेडण्यात आले आहे. पॅलेस्टाईनी लोकांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी सुद्धा करण्यात आली.

हसन नसराल्लाह हा हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेचा प्रमुख होता. इस्रायलच्या विरोधात अनेक दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा हात होता. मोसाद कडून लेबनॉनच्या बेरूत मध्ये झालेल्या पेजर हल्लूयानंतर हिजबुल्लाह पुढच्या कारावाईच्या तयारीत होती. त्याच दरम्यान, इस्रायलच्या सुरक्षा दलाने टिपून हिजबुल्लाच्या नेतृत्वाला संपवले. याच पार्श्र्वभूमीवर, काश्मीर मधील पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या मेहबुबा मुफ्ती यांनी आपला प्रचारदौरा रद्द केला. आपल्या द हँडल वरुन त्यांनी या संदर्भात माहिती दिली. या दुःखाच्या प्रसंगी पॅलेस्टाईन आणि लेबनॉनच्या लोकांच्या पाठीशी आम्ही उभे आहोत, असे देखील त्या म्हणाले.

भाजपचे टिकास्त्र

भाजप नेते आणि जम्मू-काश्मीरचे माजी उपमुख्यमंत्री कविंदर गुप्ता यांनी यावरुन टिका केली आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले हसन नसराल्लाहच्या मृत्यूचा मुफ्ती यांना एवढा पुळका का वाटतो ? बांग्लादेशात ज्या वेळेस हिंदूंवर हल्ले केले गेले, त्यांचा खून करण्यात आला, तेव्हा मात्र ह्या मूग गिळून गप्प बसल्या होत्या. या मगरीच्या आसवांमागचे सत्य लोकांना चांगलेच ठाऊक आहे.

मध्य पूर्वेत तणावपूर्ण स्थिती.

मागील काही आठवड्यांपासून मध्य पूर्वेत तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. इस्राएल आणि हिजबुल्लाह यांच्यातील संघर्षामुळे, सगळीकडे भीतीचे वातावरण पसरलेले दिसून येते. हमास आणि हिजबुल्लासारख्या दहशतवादी संघटनांमुळे सामान्य माणसांना दहशतीच्या छायेखाली जगावे लागत आहे. त्यातच आता नसराल्लाह याच्या मृत्यूमुळे, या संघर्षाला नवीन वळण शक्यता आहे.

## अखेर कास पठार दुर्मिळ फुलांनी बहरले; पर्यटकांची गर्दी वाढली

दैनिक आपला विदर्भ






**सातारा/प्रतिनिधी** : सर्वांनाच उत्सुकता लागलेल्या कासपुष्प पठाराच्या फुलांचा मोठ्या प्रमाणात बरं सुरु झाल्याने संपूर्ण कास पठार या दुर्मिळ फुलांनी बहरून गेले आहे त्यातच सात वर्षांनी एकदाच फुलणारी टोपली कारवी देखील यंदा फुलल्याने पर्यटकांना ही दुर्मीळ फुले आकर्षित करत आहेत त्यामुळे ही दुर्मिळ फुले पाहण्यासाठी कास पठारावर आता सुट्ट्यांच्या दिवशी पर्यटकांची मोठी गर्दी होताना दिसत आहे आज देखील ही फुले पाहण्यासाठी एकच गर्दी झाल्याचं पाहायला मिळाले.

या फुलांमध्ये सात वर्षांनी फुलणारी टोपली कारवी, कंदील फुल,मिकी माऊस , जेली फुल,तेरडा,विविध प्रकारचे ऑर्किट,कुमुदिनी तलावातील दुर्मिळ कमळ फुल, यासह अनेक प्रकारची दुर्मिळ फुले सध्या मोठ्या प्रमाणात उमलली असून ही फुले पाण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे म्हणूनच अनेक वर्षांपूर्वी एनेस्को या जागतिक संस्थेने देखील कास पुष्प पठाराला जागतिक पुष्प पठार म्हणून घोषित केले आहे.

सध्या ही फुले पाहण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक एका व्यक्तीला दीडशे रुपये इतकी तिकीट कास वन समितीच्या वतीने ठेवण्यात आले आहे तर येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांना ऑनलाइन पद्धतीने बुकिंग करूनच येथे यावे लागत आहे सध्या दररोज हजारो पर्यटक या वारसा स्थळाला भेट देऊन ही दुर्मिळ फुले पाहत आहेत यामध्ये राज्यास परराज्यातील देखील अनेक पर्यटक या ठिकाणी फुले पाहायला आलेले देखील दिसत असून या फुलांचा बहर आता मोठ्या प्रमाणात वाढल्याने पर्यटकांची गरदि देखील वाढू लागली आहे

# गुजरात येथून आलेल्या मशाल ज्योतीचे मेहेकरात जल्लोषात स्वागत

## मशाल ज्योतीचे स्वागत करण्याचे भाग्य मला मिळाले. त्यामुळे मी धन्य झालो–सिद्धार्थ खरात



**मेहकर/प्रतिनिधी : भक्ती आणि शक्तीचा उत्सव असलेल्या नवरात्र उत्सवानिमित्त घटस्थापनेला दरवर्षी मेहकर येथील जय दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने गुजरात राज्यातील पावागड येथून मशाल ज्योत आणण्यात येते. ही मशालजोत दि. २९ सप्टेंबर रोजी मेहकर येथे आणण्यात आली. या मशाल ज्योतीचे मेहकर शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब गटाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या सह भाविकांच्या वतीने जल्लोसात स्वागत करण्यात आले.**

भक्ती आणि शक्तीचा उत्सव असलेल्या नवरात्र उत्सवाला येत्या ३ ऑक्टोबर पासून प्रारंभ होणार आहे. दि. ३ ऑक्टोबर रोजी घटस्थापना होऊन दुर्गा देवीचे आगमन होणार आहे. या नवदुर्गा उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर मेहकरमध्ये दरवर्षी जय दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने गुजरातमधील पावागड येथून मशाल ज्योत प्रज्वलित करून मेहकर येथे पायी चालत मेहकर येथे आणली जाते. यावर्षी ही मशाल ज्योत दि.२९ सप्टेंबर मेहकरमध्ये पोहचली.

यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी ही या मशाल यात्रेचे भव्य दिव्य स्वागत करण्यात आले.यावेळी मेहकर शहर प्रमुख किशोर गारोळे, युवासेना शहर प्रमुख ड. आकाश घोडे, तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि मेहकरमधील तमाम नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.



## विविध वृत्त...

### भवानी टेकडी येथे साहसी खेळ वन उद्यानाचे ना. राठोड यांच्या हस्ते लोकार्पण





दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी :** दिग्रस तालुक्यातील भवानी टेकडी येथे साहसी खेळ वन उद्यानाचे लोकार्पण राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ व वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.संजय भाऊ राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या भागातील विद्यार्थी तसेच तरुणांची जिज्ञासा या उद्यानामुळे पूर्ण होणार आहे. राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक साहसी खेळांच्या स्पर्धा होत असतात. या उद्यानामुळे इथे प्रशिक्षित होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी आपल्या भागाचे प्रतिनिधित्व करता येईल.

साहसी खेळ हे भीतीवर मात करून जोखीम पत्करण्याची शिकवण आपल्याला देत असतात. साहसी खेळ हे आपले शारीरिक, मानसिक संतुलन राखण्यासोबतच आपला आत्मविश्र्वास वाढवतात. त्यामुळे आपल्या भागातील अधिकाधिक विद्यार्थी, तरुणांनी याचा लाभ घ्यावा. तसेच महिला, नागरिक यांनी देखील रोजच्या दगदगीतून वेळात वेळ काढून या निसर्गरम्य उद्यानाचा तसेच साहसी खेळाचा आनंद घ्यावा असे मा. संजय भाऊ राठोड यांनी आवाहन केले. तसेच यावेळी मा. संजय भाऊ राठोड यांनी देखील येथील साहसी खेळाचा आनंद घेतला.

### नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सत्यमेव जयते आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यातील नागरिकांच्या रेशन कार्ड तात्काळ मिळावे, रेशीम दुकानदारांच्या काळाबाजार थांबवा, ग्रामसेवक आणि ठेकेदार यांची मिली भगत बाबत चौकशी व्हावी, शहरातील रस्ते खड्डे मुक्त व्हावे, पाणीपुरवठा सुरळीत असावा यासह विविध समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब पाटील व पदाधिकारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात सत्यमेव जयते उपोषण आंदोलन सुरू केलेलं आहे.

आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहेत या आंदोलनाला विविध पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शविला आहे आज शरद पवार गटाकडून माजी विधानसभा अध्यक्ष अरुण भाई गुजराती यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन पाठिंबा दिला.

या आंदोलनात माजी विधानसभा अध्यक्ष अरुण भाई गुजराती ,तालुका अध्यक्ष शशिकांत पाटील यांच्या सह शहराध्यक्ष गिरीश देशमुख, जिल्हा संघटक परेश देशमुख, युवक अध्यक्ष शुभम सोनवणे, महिला शहर अध्यक्ष स्वाती बडगुजर यांची उपस्थिती होती.

## आमदार नितीन देशमुख यांचे सुपुत्र पृथ्वी देशमुख यांच्यावर काही सराईत गुन्हेगारांकडून अकोल्यात हल्ला





दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** ठाकरे गटाच्या शिवसेनेचे बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांचे सुपुत्र पृथ्वी देशमुख यांच्यावर काही सराईत गुन्हेगारांनी अकोल्यात हल्ला केला आहे तर अकोला शहरातल्या सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन हद्दीतील ही घटना आहे. तर पृथ्वी देशमुख हा कपड्याच्या दुकानावर उभा असताना काही सराईत गुन्हेगारांनी त्याला अडवून त्याच्यावर प्राण घातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे.तर या हल्लादरम्यान पृथ्वी देशमुखला बेदम मारहाण झाली आहे.तर आमदाराच्या मुलावर हल्लया झाल्याची माहिती मिळताच ठाकरे गटाचे शिवसैनिक मोठ्या संख्येने पोलिस ठाण्यात दाखल झाले आहेत तर देशमुखांच्या मुलावर हल्ला करणारे सर्व जण कृषी नगर भागातील रहिवासी असल्याचे समजते. तक्रार दाखल करण्यासाठी स्वतः आमदार नितीन देशमुख आणि शिवसैनिक पोलिस ठाण्यात दाखल.तर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यात पोलिसांनी तिघांना अटक केली असुन बाकीच्यांचा शोध घेत आहे.

## आचारसंहितेपूर्वी पोलीस भरती घेण्याची मागणी

### अद्वैत अकादमीचे पालकमंत्र्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ



**यवतमाळ/प्रतिनिधी :** पोलीस भरती व स्पर्धा परीक्षांचा सराव करणारे विद्यार्थी आणि अद्वैत अकादमीचे संचालक व प्रशिक्षक यांनी पोलिस भरती संदर्भात पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन दिले.

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी पोलीस भरती करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय कोरोनाच्या काळात दोन वर्षांपासून भरती न झाल्याने अनेक विद्यार्थी वयोमर्यादेमुळे अपात्र झाले आहेत. ही दोन वर्षे त्यांच्या मर्यादेत वाढवून देण्याची मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन देताना अद्वैत अकादमीचे संचालक मनोज राठोड सर, पवन कांबळे सर, शिवम बेले, सृजन उधे, किशोर चवके, राज प्राघणे, सचिन राठोड, करण वानखेडे, गोकुळ बावणे, गजानन, शहा, नाना गरपगरी, कृष्णा, चेतन राठोड, चेतन राठोड, डॉ. गोपाळ मनटुटे, अजय घनगावकर, रवेश्र्वर जाधव, कुणाल राहे आदी उपस्थित होते.




## बुलढाण्यात शौर्यपदक प्राप्त रमेश बाहेकर यांच्या उपस्थितीत जिल्हा सैनिक कार्यालयाकडून शौर्य दिन साजरा





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** देशाच्या रक्षणासाठी आपल्या जिवाची पर्वा न करता तिरंग्याची शान राखण्यासाठी दुश्मनाशी दोन हात करून युद्ध जिंकणार्या जवानांना देशाचा सर्वोच्च पुरस्कार परमवीर चक्र प्रदान करून सन्मानित करण्यात येते. देशभरात २९ सप्टेंबर हा दिवस शौर्य दिवस म्हणून साजरा केला जातो. २९ सप्टेंबर २०१६ रोजी भारतीय सैन्य दलाने उरी सेक्टर मधील अतिरेकी भ्याड हल्लयाचा बदला म्हणून पाकिस्तान हद्दीत घुसून सर्जिकल स्ट्राईक द्वारे अतिरेक्यांचा खात्मा केला होता. ही भारतीय सैन्याची अभिमानास्पद कामगिरी जनतेमध्ये सैनिकांप्रती आत्महत्या निर्माण व्हावी या अनुषंगाने २९ सप्टेंबर हा शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो. आज बुलढाण्यातील जिल्हा सैनिक कार्यालयाच्यावतीने शौर्य दिनाचे औचित्य साधून वीर माता वीर पिता आणि वीर पत्नी यांच्या सत्कार करण्यात आला तर यावेळी शौर्य पदक प्राप्त रमेश बाहेकर यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला आहे

### आनंद दिघे यांना मोठ्या पदावर बसवलं तर आपल्याला अडचण होइल, त्याचे लोकांनी त्यांचा काटा काढला; संजय शिरसाट यांचा खळबळजनक आरोप

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** आनंद दिघे साहेब यांच्या मृत्यु संदर्भात काल मी जे वक्तव्य केले त्याचे पडसाद राज्यभर उमटले. मात्र माझी जी शंका होती त्यावर मी बोललो. दिघे साहेबांवर बाळासाहेबांचे अतोनात प्रेम होते. किंबहुना दिघे साहेबांनी कधी बाळासाहेबांच्या बाजूला देखील बसण्याची हिम्मत केली नाही. दिघे साहेब किंग होताय याची खुन्नस काहींना होती, त्यामूळे हे सर्व झाले. आनंद दिघे यांना मोठ्या पदावर बसवलं तर आपल्याला अडचण होईल, अशा लोकांनीच त्यांचा काटा काढला. मी अशी अनेक प्रकरण नावानिशी उघड करण्याची ताकत ठवतो. असे म्हणत शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी खळबळजनक आरोप केला आहे.

## चोरट्यांचा शोध घेण्यास पोलिस प्रशासनाला अपयश!

- जानेफळ परिसरात चोरीच्या घटना वाढल्या पशूधन
- चोरट्यांचा शोध घेण्यासाठी नागरिकांचे उपोषण



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** पोलिस प्रशासनाच्या दुर्लक्षीत धोरणामुळे व भ्रष्टवृत्तीमुळे परिसरात अवैधधंदे वाढले असून चोरीच्या घटनाही प्रचंड वाढल्या आहेत. घरफोडी, किरकोळ चोरीसह आता चोरट्यांनी आपल्या मोर्चा पशूधनावर वळविला आहे. तर पोलिस प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड रोष व्यक्त केला आहे. तक्रार देऊनही शोध घेण्यास टाळाटाळ केली जात आहे. जानेफळ येथीलही २ लाख ११ हजारांवर किंमतीच्या म्हशी चोरट्याने चोरून नेल्या आहेत. चोरीच्या घटनेचा शोध तात्काळ घेऊन चोरट्यांना अटक करावी, या मागणीसाठी जानेफळ पोलिस स्टेशन समोर दि.२७ सप्टेंबरपासून विजय काळे व संदीप नवले यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.




जानेफळ येथील अंबिका नगर मधील अल्पभूधारक शेतकर्यांच्या दि.२५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्याने दोन ठिकाणाहून २ लाख ११ हजार ५०० रुपये किंमतीच्या तीन म्हशी व वगारू चोरून नेल्या. याबाबत दाखल फिर्यादीवरून जानेफळ पोलिस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या पूर्वीही जानेफळ येथे गोधन अज्ञात व्यक्तीने चोरल्याप्रकरणी गुन्ह्यातील अज्ञात चोरट्याचा शोध न लागला नाही. या चोरीचा तपास लावण्यात पोलिस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने तसेच यापूर्वी सुद्धा जानेफळ पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्याने गोधनाची चोरी गेलेल्या घटनांचा तपास करण्यास पोलिस प्रशसानाने अक्षम्य दुर्लक्ष केल्याने चोरट्याचे मनोधैर्य वाढले आहे. परिणामी परिसरात चोरीच्या घटना वाढल्या आहेत. चोरट्याचे जानेफळ व परिसरामध्ये मोठे रॅकेट सक्रिय असल्याने पाळीव प्राण्याच्या चोरीच्या घटनेत सातत्याने वाढ होत आहे. या चोरीच्या घटनांना आळा बसावा यासाठी पोलीस प्रशासनाने चोरट्यांना शोध घेऊन अटक करावी, यामागणीसाठी २७ सप्टेंबरपासून जानेफळ पोलीस स्टेशन समोर विजय चैनकर काळे व संदीप विश्र्वनाथ नवले यांनी आमरण उपोषणाला सुरवात केली आहे.

### ठाणेदारांचे दुर्लक्ष

जानेफळ पोलिस स्टेशनतंर्गत पशूधन चोरीच्या घटना प्रचंड वाढल्या असून या घटनांना आळा घालण्यासाठी ठाणेदार अजिनाथ मोरे यांनी जातीने लक्ष देऊन चोरट्यांना बेड्या ठोकाव्या, पशू पालन करणार्या नागरिकांना चोरट्यांपासून दिलासा द्यावा, अशी मागणी पशुपालकांकडून होत आहे.

### जानेफळ पोलीस स्टेशन वादाच्या भवऱ्यात

वाढत्या क्राइम ला पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष पोलीस प्रशासन गुंतले चिरी मारीत. जानेफळ पोलीस स्टेशन हे नेहमीच वादाच्या भौऱ्यात असते या पोलीस स्टेशन अंतर्गत विविध वाद विवाद व अवैध धंद्यांचा मोठा प्रमाणात पाहायला मिळत आहे या ठिकाणी मोठे क्राईम म्हणजेच खून दरोडे नकली नोटा असे मोठे अपराध सुद्धा होत असतात मात्र यामध्ये योग्य त्या पद्धतीने तपास होत नसल्यामुळे सतत ओरड असते तर याकडे संबंधित ठाणेदार सक्षम दुर्लक्ष केल्याचे स्थानिक नागरिक बोलत असून नागरिकांमध्ये प्रचंड येत आहे.